सत्यमेव जयते

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

व्दारा-विभागीय क्रीडा संकुल,गारखेडा परिसर, औरंगाबाद
Email-dso.abd@mail.com

जा.क्र.जिक्रीअ/शिबीर/क्रीप्रिशि/2017-18/का-4/३६० दिनांक: 13/03/2018

प्रति,

गट शिक्षणाधिकारी(सर्व)
जि. औरंगाबाद.

विषय : क्रीडा शिक्षकांसाठी जिल्हास्तर क्रीडा प्रशिक्षण शिबीर आयोजन 2017-18 क्रीडा शिक्षक नियुक्ती बाबत..

संदर्भ :- 1.शासन निर्णय क्र.राक्रीधो-2012/प्र.क250/क्रीयुसे-2 दि.20 एप्रिल 2014

महोदय,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की,संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन प्रचार व प्रसार जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे.याच भुमीकेतुन राज्याचे क्रीडा धोरण घोषीत करण्यात आलेले आहे.या शासन निर्णयास अनुसरुन खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान,प्रशिक्षणाच्या पध्दती,खेळामधील कौशल्यातील ओळख,नविन खेळाची ओळख,खेळाची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी क्रीडा शिक्षकांना करुन देणे तसेच त्यांच्या ज्ञानात भर पडावी व त्यांना ते अवगत होण्यासाठी जिल्हास्तर प्रशिक्षण शिबीराची तरतुद आहे.

या तरतुदीनुसार औरंगाबाद जिल्हयातील क्रीडा शिक्षकांसाठी उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये जिल्हा क्रीडा अधिकरी कार्यालय,औरंगाबाद यांच्या वतिने दिनांक 20 मार्च ते 29 मार्च 2018 दरम्यान विभागीय क्रीडा संकुल,गारखेडा परिसर, औरंगाबाद येथे 10 दिवसाचे निवासी जिल्हास्तर प्रशिक्षण शिबीर आयोजीत करण्यात आले आहे.

सदर प्रशिक्षणा शिबीरामध्ये प्रशिक्षणार्थीना विविध शासन मान्य खेळाविषयी अधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण पध्दती, खेळामधील नविन कौशल्य,खेळाची शास्त्रोक्त माहीती,स्पर्धा पध्दती, वयोगट, पुरस्कार, क्रीडा सुविधा व योजना या विषयासंबधी सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरार्थींना प्रशिक्षणा दरम्यान गणवेश (ट्रक सुट) भोजन -निवास व्यवस्था मोफत करण्यात येईल. आपल्या तालुक्यातील किमान 15 क्रीडा शिक्षकांची निवड करुन शिबीरास उपस्थित राहणेसंबधी आपल्या स्तरावरुन आदेशीत व्हावे .

| | | |
|---|---|---|
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | ३१/०३/१८<br>जिल्हा क्रीडा अधिकारी |
| जि.प. औरंगाबाद | जि.प. औरंगाबाद | औरंगाबाद |